॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४—२५/२९० दिनांक १७/१२/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:— दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करणे बाबत.**

**संदर्भ:** 1) मा.उपसचिव,अल्पसंख्याक विभाग, मुंबई यांचे परिपत्रक क्र.अविवि—२०२४/प्र.क्र.५१/का.८ दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजीचे परिपत्रक.
2) मा.उपसचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे जा.क्र.राअआ/अ.ह.दि./प्र.क्र. २६९/२०२४/का.३ दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजीचे पत्र.
3) मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे जा.क्र. २०२४/टे—१२/जपुती/सीआर— दि. १७/१२/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयी मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी संदर्भ क्र. १ व २ अन्वये दिनांक १८ डिसेंबर हा दिवस **"अल्पसंख्याक हक्क दिवस"** म्हणून साजरा करण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयात दिनांक १८ डिसेंबर हा दिवस **"अल्पसंख्याक हक्क** म्हणून सोबतच्या परिपत्रकात व पत्रात निर्देशित केलेल्या सुचनांचे पालन करून साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल फोटो, व्हिडीओ, शासनास पाठवावयाचे असल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई—मेल वर दिनांक १९ डिसेंबर २०२४ पर्यंत न चुकता पाठविण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः अविवि - २०२४/प्र.क्र. ५१/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ डिसेंबर, २०२४

प्रस्तावना-

संयुक्त राष्ट्र संघटनेने दि.१८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तृत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतचे वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी याद्दष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने सूचना दिल्या आहेत. दि.१८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राबविण्यात येतो.

शासन परिपत्रक -

दिनांक १८ डिसेंबर हा दिवस राज्यपातळीवर प्रतिवर्षी "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्यात यावा. याद्दष्टीने या दिनांकास खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत:-

१. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव/माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. सर्व जिल्हयात शाळा व महाविद्यालयांमध्ये अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी गट व विद्यार्थी यांच्याकरिता विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. यामध्ये खालील बाबींचा समावेश असावा :-

अ)भित्तीपत्र स्पर्धा
ब) वक्तृत्व स्पर्धा
क) निबंध स्पर्धा
ड) उपरोक्त कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके
इ) व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद इ.

३. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांना मेळावे, चर्चासत्रे इत्यादीद्वारे प्रसिध्दी देण्यात यावी.

४. राज्यात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्यासाठी सर्व जिल्हयात सूचना देणे कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे, कार्यक्रमांचे आयोजन मार्गदर्शन करणे इत्यादी जबाबदारी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची राहील. तसेच जिल्हयात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्याची जबाबदारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास शासनाकडून, "मागणी क्र. झेड ई-१, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज

कल्याण २०० व इतर कार्यक्रम २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनेंतर्गत योजना (०१) अल्पसंख्याकांना सहाय्य (०१) (१२) संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी याकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-१८७) ३१, सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या अनुदानातून रु.१०.०० लक्ष इतक्या मर्यादेत खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

५. उपरोक्त सूचनांआधारे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग व जिल्हाधिकारी यांनी शासनास प्रतिवर्षी सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२४१२१६१२२६३८२३१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MILIND PADMANABH SHENOY

(मिलिंद शेणॉय)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. विरोधी पक्षनेता, विधानसभा व विधापरिषद यांचे खाजगी सचिव,
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सहसचिव/ उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सहसचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
१४. व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
१५. निवड नस्ती, का.८